# मुंबई विद्यापीठ

मशिमाक/ ०६ /२०२४–२०२५

परिपत्रक :–

विषय:– विद्यापीठातर्फे आदर्श प्राचार्य पुरस्कार सन २०२३–२०२४ शिफारस करणेबाबत...

मुंबई विद्यापिठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, सन २०२३–२०२४ या शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयीन स्तरावर आदर्श प्राचार्यांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलल्या निकषांच्या आधारावर महाविद्यालयातील २ प्राचार्य (यापैकी १ शहरी व १ ग्रामीण महाविद्यालयातील प्राचार्य) विद्यापीठातर्फे निवड होणाऱ्या पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्यांना प्रत्येकी रू. ११,०००/– (रूपये अकरा हजार फक्त) रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

तरी या परिपत्रकाद्बवारे सर्व संबंधिताना असे कळविण्यात येत आहे की, महाविद्यालयातील विविध शाखाअंर्तगत कार्यरत असलेले प्राचार्य यांना ५ वर्षे सेवा झालेल्या चारिज्यसंपन्न, विशेष प्राविण्यासह अर्हता व अनुभव असलेल्या प्राचार्यांनी सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या इंग्रजी प्रतीमध्ये भरून उपकुलसचिव महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष २०४, दुसरा मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२ यांचेकडे आवक विभागामार्फत **सोमवार दिनांक १५ जुलै, २०२४** पर्यंत प्रस्ताव प्रत्येकी चार प्रतीत सादर करावेत (संबधित प्राचार्यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/दूरध्वनी क्रमांक/ महाविद्यालयाच्या दूरध्वनी क्र. व घरचा पूर्ण पत्ता, तसेच संबधित प्राचार्यांचे विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत (Teachers/Principal approval) सोबत जोडणे आवश्यक आहे. **दिनांक १५ जुलै, २०२४** नंतरचे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत तसेच अपुऱ्या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.) तसेच महाविद्यालयीन प्राचार्य यांचा प्रस्ताव संस्थाचालक यांचे मार्फत शिफारशीसह पाठविणे आवश्यक आहे.

मुंबई– ४०००३२
दिनांक २६ जून, २०२४

(डॉ. बळीराम गायकवाड)
कुलसचिव (प्रभारी)
मुंबई विद्यापीठ

...२/–

प्रति,

मुंबई विद्यापिठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॅाटेल मॅनेजमेंट महाविद्याल यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित:—

१) कुलगुरूंचे कार्यकारी सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
२) स्वीय सहायक, प्र. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
३) स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२

# मुंबई विद्यापीठ

## वर्ष २०२३—२०२४ या वर्षाकरिता आदर्श प्राचार्य पुरस्काराकरिता शिफारस/अर्ज

प्राचार्याचे नाव:______________________________

महाविद्यालयाचे नाव : ____________________ प्रथम नियुक्ती दिनांक____________

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य म्हणून सलग ५ वर्षे सेवा झालेली आहे काय? | |
| २. | शोधपत्रिकेत (ISSN) प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांची संख्या. (वैयक्तिक) | |
| ३. | प्रकाशित साहित्य/पुस्तके (ISBN) ची संख्या. (वैयक्तिक) | |
| ४. | राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या व उपस्थिती (वैयक्तिक) | |
| ५. | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग | |
| ६. | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे? नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले? | |

...२/—

| | | |
|---|---|---|
| ७. | महाविद्यालयाचे नॅक/एनबीए संस्थेकडून मूल्यांकन/पुनर्मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे? सद्यस्थितीचा दर्जा/स्कोअर काय आहे? | |
| ८. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे निकाल/गुणवत्तेबाबत मागील पाच वर्षाचा आलेख | |
| ९. | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरू केले? | |
| १०. | महाविद्यालयातील किती अध्यापकांना/ विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहित करण्यात आले? तद्वतच महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (मेजर) व लघु (मायनर) स्वरूपाचे किती प्रकल्प सादर करण्यात आले आहेत? तसेच मान्य झालेल्या प्रकल्पांची संख्या | |
| ११. | महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत (भौतिक व शैक्षणिक)? तसेच महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छते संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते? | |
| १२. | महाविद्यालयामार्फतराज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? | |
| १३. | महाविद्यालयास विविध उपक्रमाबद्दल मिळालेली पारितोषिके | |

| | | |
|---|---|---|
| १४. | महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी. किंवा इतर संस्थांकडून प्राप्त झालेले अनुदान) | |
| १५. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले? | |
| १६. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे एन.सी.सी./एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात? | |
| १७. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (इंटरनॅशनल पीअर जर्नल) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोधनिबंध प्रकाशित केले? | |
| १८. | महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात? | |
| १९. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते? महिला तक्रार निवारण कक्ष | |
| २०. | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे. सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्यात येते काय? | |

| | | |
|---|---|---|
| २१. | महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे? | |
| २२. | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणा—या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत. | |
| २३. | इतर | |

(महिती आवेदकाने स्वतः भरून संस्थेच्या सचिव/अध्यक्षांमार्फत सादर करावी.

**संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय**

(टिप : प्राचार्य सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________

स्थळ :

दिनांक :

संस्थेचे नावः—______________________________

अध्यक्ष/सचिवांची
स्वाक्षरी व शिक्का

कार्यालयीन उपयोगाकरिता

अहवालातील निरिक्षण